# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/10/2023 (गुरूवार) सकाळ

---

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. सावनेर** :— दिनांक २०/०४/२०१४ चे १३.१० वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे अप क्र. ७५/१४ कलम ३६३, ३७६(२)(आय), ३४२, ५०६ भादवि. सह.क. ३, ४ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १२/०४/२०१४ चे २१.०० वा. ते दिनांक १४/०४/२०१४ चे संध्याकाळ पर्यंत यातील फिर्यादी/ पिडीत मुलीस आरोपी नामे— राजेन्द्र राघोबाजी पाटील, वय ४० वर्ष, रा. ब्राम्हण पिपळा त. सौंसर जि. छिंदवाडा याने सौंसर जि. छिंदवाडा (M.P) ला पोहचवुन देतो असे म्हणुन आरोपीने फिर्यादी/ पिडीत मुलीला टाटा मॅजीक गाडीत बसवुन सावनेर बस स्टॅंड पासुन ३ कि.मी. परिसरात जंगलामध्ये घेवुन गेला. त्यानंतर आरोपीने फिर्यादी/ पिडीत मुलीसोबत जबरी संभोग केला. व कुणाला सांगीतल्यास जिवाने मारण्याची धमकी दिली. तसेच आरोपीने फिर्यादी / पिडीत मुलीला त्याचे राहते गावी अडकवुन ठेवले.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस उपनिरीक्षक सोनाली राठोड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. अतिरीक्त सत्र न्यायाधीश नागपूर श्री. राजकारणे साो. कोर्टामध्ये सादर केले. दिनांक १२/१०/२०२३ रोजी मा. अतिरीक्त सत्र न्यायाधीश श्री. राजकारणे साो. यांनी वरील सदर गुन्हयातील आरोपीस कलम ३४२ भादवि. मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू. दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी कैद. तसेच कलम ५०६(२) भादवि. मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू. दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी कैद कलम ४ पोक्सो मध्ये ७ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू. दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने ए.पी.पी. खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा/३७६ मधुकर आदमने पो.स्टे. सावनेर यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**